# ।। संतश्रेष्ठ श्रीनिवृत्तिनाथ महाराज ।।

**जन्म: माघ वद्य प्रतिपदा शके ११९५**

**समाधि: जेष्ठ वद्य द्वादशी शके १२१९**



श्रीमत् सच्चिदानंद स्वामी स्वरूपानंदांचे गुरुपरंपरेतील संतश्रेष्ठ श्रीनिवृत्तिनाथांच्या त्र्यंबकेश्वर यात्रेचा आजचा दिन. श्रीनिवृत्तिनाथांचा समाधीदिन जेष्ठ वद्य द्वादशी. परंतु त्या वेळी सर्व वारकरी आषाढी यात्रेस निघालेले असल्याने हा दिन सर्वानुमते पौष वद्य एकादशीस साजरा केला जातो व आजच्या दिवशी लाखो वारकरी त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी श्रीनिवृत्तिनाथांच्या समाधीदर्शनास जमतात.

साक्षात् श्री शिवावतार असल्याने विरक्त व नावाप्रमाणेच निवृत्त असलेल्या या योगीभक्ताबद्दल जनांमध्ये, श्री ज्ञानेश्वर माऊलीचे गुरु, यापलिकडे विशेष माहिती नाही. श्री निवृत्तिनाथांचे वडील श्रीविठ्ठलपंत हे आपली पत्नी रुक्मिणी व चारही मुलांसमवेत ब्रह्मगिरीच्या परिक्रमेत असताना अचानक वाघाची डरकाळी आल्याने त्यांची ताटातूट होते व निवृत्तिनाथ ब्रह्मगिरी पर्वतात जवळच्या एका गुंफेत शिरतात. तेथे त्यांची श्री गहिनीनाथांशी भेट होते व त्यांना नाथपंथाची दीक्षा प्राप्त होते. नाथपंथात अनन्यसाधारण महत्त्व असलेली अनुपानशीला याच ब्रह्मगिरी पर्वतावर आहे, जेथे नाथांचा मेळा आजही भरतो. पर्वतावरील श्रीगोरक्ष गुंफेत श्रीगोरक्षनाथ आजही तपश्चर्येत मग्न आहेत. ब्रह्मगिरीच्या माथ्यावर पवित्र श्रीगोदावरीचा उगम आहे. समाधिस्थित श्रीशिवशंभुसमान दिसणाऱ्या या ब्रह्मगिरीच्या दुरुन दर्शनानेही मनात एक पवित्र शांत भावना उदय पावते. आपल्या मायपित्यांच्या देहत्यागानंतर श्री निवृत्तिनाथांनी आपल्या तिन्ही भावंडांना माय-बाप व गुरु या तिन्ही भूमिकेतून सर्वतोपरी सांभाळले व तहहयात आपले कृपाछत्र त्यांजवर ठेवले. आपल्या तिन्ही भावंडांनी समाधि घेतल्यानंतरच श्री निवृत्तिनाथांनी आपले अवतारकार्य समाप्त केले व याच ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी जेष्ठ वद्य द्वादशी शके बाराशे एकोणीसमध्ये वयाच्या चोवीसाव्या वर्षी संजीवन समाधि घेतली.

सामान्यत: संतांच्या अभंगात प्रभुविरहाचे, आर्ततेचे अनेक अभंग सापडतात पण श्रीनिवृत्तिनाथांच्या अशा रचना जवळजवळ नाहीतच. याचे कारण बहुतेक करुन त्यांना सद्गुरुप्रसादाने ‘त्वरित’ प्राप्त झालेली ज्ञानीस्थिती हे असावे. श्रीसद्गुरुंच्या आज्ञेने श्रीनिवृत्तिनाथांनी आपल्या तीनही भावंडांना ही पारंपारिक गुरुगम्य खूण देऊन कृतार्थतेचा अनुभव दिला. *हीच परंपरा श्रीस्वामी स्वरूपानंदांपर्यंत चालत येऊन श्रीस्वामींनी*

*हाच कृतार्थतेचा अनुभव घेतला. (स्वामी म्हणे झाले कृतार्थ जीवन । सद्गुरु चरण उपासिता ।।)* भावार्थदीपिकेत श्रीसद्गुरु अर्थात् श्रीनिवृत्तिनाथांचे वर्णन करताना श्री ज्ञानेश्वर माऊली थकत नाहीत उलट त्यांच्या प्रतिभेस आगळाच बहर येतो. ते म्हणतात;

**हे असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकरु माथां पारुखे ।**
**तो जीवचि परि तुके । महेशेंसीं ।।९।। (ज्ञानेश्वरी अध्याय १०)**

*जयाचिया माथां । पडे पद्म-हस्त । कृपादृष्टी होत । जयावरी ।।२२।।*
*असोनि तो जीव । तयालागीं साची । शिव-स्वरूपाची । योग्यता ये ।।२३।।*
*(अभंग ज्ञानेश्वरी अ. १०)*

श्रीनिवृत्तिनाथांचे अद्वैत योगानुभवाचे, गुरुकृपा वर्णनपर, श्रीहरी-विठ्ठल वर्णनपर, पंढरी-विठ्ठलमाहात्म्य वर्णनपर, नामामृतवर्णनपर, व उपदेशपर असे अनेक अभंग उपलब्ध आहेत. श्रीनिवृत्तिनाथांचा हरिपाठसुद्धा प्रसिद्ध आहे.

**श्रीनिवृत्तिनाथांचे काही अभंग:**

आदिनाथ उमाबीज प्रकटिलें । मछिंद्रा लाधली सहजस्थितीं ।।१।।
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गयनिनाथा ।।२।।
वैराग्यें तापला सप्रेमें निवाला । ठेवा जो लाधला शांतिसुख ।।३।।
निर्द्वंद्व नि:शंक विचरतां मही । सुखानंद हृदयीं स्थिर जाला ।।४।।
विरक्तीचें पात्र अन्वयाचें मुख । देऊनि सम्यक अनन्यता ।।५।।
निवृत्ति गयनी कृपा केली असे पूर्ण । कूळ हें पावन कृष्णनामें ।।६।।

---*---

हरी हेचि खूण सांगितली आम्हा । जनवनसमा वर्ता तुम्ही ॥१॥
ॐकार मूर्धनी करावा कीर्तनी । नित्य ब्रह्मार्पणी भजन भावे ॥२॥
नित्यकाळ कथा हरी विचरो सार । जन वन घर आम्हा असे ॥३॥
निवृत्ति म्हणे मी गुरुचा अंकित । वाचे उच्चारीत हरी हरी ॥४॥

---*---

स्वरूप साजणी निद्रिस्त निजलें । भलें चेतविलें गुरुरायें ॥१॥
सावध सावध स्मरे रे गोविंद । अवघा परमानंद दुमदुमित ॥२॥
निद्रेचिया भुलीं स्वरूपविसरू । प्रकाशला थोरु आत्माराम ॥३॥
निवृत्तिदेवो आनंद झालिया । लवति बाहिया स्वस्वरूपीं ॥४॥

---*---

आम्हां हेंचि थोर सद्गुरुविचार । नलगें संप्रधार नानामतें ॥१॥
नेघों ते काबाड न करूं विषम । ब्रह्मांड हें होत आत्माराम ॥२॥
नेदूं यासि दुःख उन्मनीचें सुख । न करूं तो शोक आला गेला ॥३॥
निवृत्ति म्हणे आम्हां सद्गुरु उपदेश । सर्वांभूतीं वास हरि असे ॥४॥

---*---

आम्हां जप नाम गुरुखूण सम । जन वन धाम गुरुचेचि ॥१॥
नेघों कल्पना न चढों वासना । एका पूर्णघना शरण जाऊ ॥२॥
तप हें अमूप नलगे संकल्प । साधितां संकल्प जवळी असे ॥३॥
निवृत्ति म्हणे मज निरोपिलें धन । हेचि ब्रह्मखुण जाणिजेसु ॥४॥

---*---

हरिविण न दिसे जनवन आम्हा । नित्य तें पूर्णिमा सोळा कळी ॥१॥
चन्द्रसूर्यरश्मी न देंखों तारांगणें । अवघा हरि होणें हेंचि घेवो ॥२॥
न देखो हे पृथ्वी आकाश पोकळीं । भरलासे गोपाळीं दुमदुमीत ॥३॥
निवृत्ति निष्काम सर्व आत्माराम । गयनी हे धाम गूजगम्य ॥४॥

---*---

सार नि:सार निवडूनि टाकीन । सर्व हा होईन आत्माराम ।।१।।
राम सर्वा घटीं बिंबलासे आम्हां । पूर्ण ते पूर्णिमा सोळाकळी ।।२।।
न देखों दूजें हरिविण आज । आणिकाचें काज नाहीं तेथें ।।३।।
निवृत्ति गौरव गुरुमुखें घेत । आपणचि होत समरसें ।।४।।

---*---

परापवाद कानी परनिंदा झणी । ऐकता निजमौनी कृष्ण जप ।।१।।
हरी हरी म्हणे नायके ते मातु । द्वैत तया आतु ने घे बापा ।।२।।
दुजियाचि निंदा अपवाद सदा । वाचेसी गोविंदा जप करी ।।३।।
निवृत्ति तत्पर नाईके ते शब्द । नित्यता गोविंद जपतसे ।।४।।

---*---

परनिंदा झणी परपीडा जनी । नित्यता कीर्तनी हरी जपे ।।१।।
उच्चार पापाचा विभाग ये त्याचा । वेगे हरि वाचा जपे रया ।।२।।
दुजिया पीडणे द्वैत तेचि जाणा । अद्वैत ते खूण हरी एकू ।।३।।
निवृत्ति तटाक सर्व कृष्ण एक । अद्वैत हे लेख ब्रह्म सत्य ।।४।।

---*---

समता वर्तावी अहंता खंडावी । तेणेचि पदवी मोक्षमार्ग ।।१।।
क्षमा धरा चित्ती अखंड श्रीपति । एका तत्व चित्ती ध्याईजेसु ।।२।।
नाम हाचि मंत्र  नित्य नाम सार । दुसरा विचार घे नये ।।३।।
अन्य शास्त्रे भजता नाही पै मुक्तता । हरिनाम गाता मुक्ति रोकडी ।।४।।
नित्य सुख घ्यावे नामचि अनुभवावे । तरिच सुख पावावे इही लोकी ।।५।।
निवृत्ति भजन नित्य अनुष्ठान । एक रूप ध्यान मनी ध्यातु सर्वदा ।।६।।

---*---

एक देव आहे हा भाव पैं सोपा । द्वैतरूप बापा पडसी नरकीं ।।१।।
द्वैत सांडी अद्वैत धरी । एक घरोघरी हरी नांदे ।।२।।
सबाह्य कोंदलें परिपूर्ण विश्वीं । तोचि अर्जुनासि दृष्ट जाला ।।३।।
गयनि प्रसादें निवृत्ति बोधु । अवघाचि गोविंदु अवघा रूपीं ।।४।।

---*---

कांसवीचीं पिलीं करुणा भाकी । परि संपडलीं निकीं चरणसोय ।।१।।
कामधेनु घरीं हरि माझा गोपाळ । मज काळवेळ नाठवें तैसी ।।२।।
चातकाची चिंता जरी नपवे जीवन । तरीच शोकें प्राण तृषा हेतु ।।३।।
निवृत्ति स्वानंदु कामधेनु गुरु । नामाचा उच्चार तेणें छंदें ।।४।।

---*---

कल्पितें कल्पिलें चित्त आकळिलें । तन्मय घोळिलें चैतन्याचें ।।१।।
सांग माये कैसें कल्पिलें कायसे । सर्व हृषीकेश दिसे आम्हां ।।२।।
निवृत्ति समरस सर्व हृषीकेश । ब्रह्मींचा समरस कल्पने माजी ।।३।।

---*---

प्रपंचाची वस्ति व्यर्थ काह्या काज । आम्हा बोलतां लाज येत सये ।।१।।
काय करूं हरि कैसा हा गवसे । चंद्र सूर्य अवसे एकसूत्र ।।२।।
तैसें करूं मन निरंतर ध्यान । उन्मनि साधन आम्हां पुरे ।।३।।
निवृत्ति परिपाठ हरिनाम हेचि वाट । प्रपंच फुकट दिसे आम्हां ।।४।।

---*---

देवेवीण ठावो नाही रये मही । आत्मप्रकाश पाही बिंबलासे ।।१।।
वासना संगु करितसे पांगु । जीवशिव भंगु कल्पनेचा ।।२।।
सर्व जीव शिव हाचि धरा भाव । हारपला सर्व हरी रुपी ।।३।।
निवृत्ति तारक हरी रूप एक । हाचि एक विवेक एक तत्त्वी ।।४।।

---*---

एकरूपें दिसे भेदरूप भासे । ज्ञानियासी कैसें एक तत्व ।।१।।
तत्वता एक असे सर्व । सांडुनी देहभाव पाहा ।।२।।
देवेंविण कोठें रितें नाहीं सर्वथा । संपूर्ण पुरतां हरी आहे ।।३।।
निवृत्तीची खूण एकतत्वरूपें । पाहातां सोहपें गुरुखुणें ।।४।।

---*---

चातकाचें ध्यान मेघाचें जीवन । आम्हां नारायण तैसा सखा ।।१।।
चकोरा अमृत चंद्र  निववितें । भक्तांसि दुभतें हरि आम्हां ।।२।।
विश्रांतीसी स्थळ वैकुंठ सफळ । दुभतें गोपाळ कामधेनु ।।३।।
आशापाश नाहीं कर्तव्या कांही । चिंतामणि डोहीं एकविध ।।४।।
समिरासगट गति पावली विश्रांति । नामरूप जाति भेदशून्य ।।५।।
नामाची हे धणी तेचि हो पर्वणी । तृप्तातृप्त तृप्ती होतु आम्हां ।।६।।
सांडिले पैं  द्वैत दिधलें पै अद्वैत । हरीविण रितें न दिसे आम्हां ।।७।।
निवृत्ति परिवार मुक्तलाग अरुवार । रत्नांचा सागर नामें वोळे ।।८।।

---*---

उन्मनी अवस्था लागली निशाणी । तन्मयता ध्यानी मुनीजना ।।१।।
मन तेथे नाही पहासी रे काही । सर्व हरि डोही बुडी दे का ।।२।।
मनाची कल्पना देहाची भावना । शून्य ते वासना हरिमाजी ।।३।।
निवृत्ति म्हणे सर्व हरिपीक पिकले । ज्ञानासी लाधले गुरुकृपा ।।४।।

---*---

जनासी तारक विठ्ठलचि एक । केलासे विवेक सनकादिकीं ।।१।।
तें रूप वोळले पंढरीस देखा । द्वैताची पै शाखा तोडीयेली ।।२।।
उगवलें बिंब अद्वैत स्वयंभ । नाम हें सुलभ विठ्ठलराज ।।३।।
निवृत्तीचें गूज विठ्ठल सहज । गयनीराजें मज सांगितलें ।।४।।

---*---

अष्टांग सांधनें साधिती पवन । ज्यासि योगीजन शिणताती ।।१।।
तो हा कृष्ण गोपीगोपाळांमाझारी । क्रीडा नानापरी करी आत्मा ।।२।।
अठरा साहिजणें बोलती परवडी । तो माखणासि जोडी स्वयें कर ।।३।।
निवृत्तीचें ध्येय कृष्ण हाचि होय । गयनिनाथें सोय दाखविली ।।४।।

---*---

सर्वांघटी वसे तो आम्हां  प्रकाशे । प्रत्यक्ष आम्हां  दिसे गुरुकृपा ।।१।।
विरालें ते ध्येय ध्यान गेलें मनीं । मनाची उन्मनि एक जाली ।।३।।
ठेला अहंभाव सर्व  दिसे देव । नि:संदेह भाव नाहीं आम्हां ।।३।।
निवृत्ति साधन गयनिप्रसादें । सर्व हा गोविन्द सांगतुसे ।।४।।

---*---

अनुभवाच्या गावी ज्ञान हेंचि फळ । विज्ञान केवळ वृक्ष तया ।।१।।
साधनीं स्वानुभव अनुभवी अनुभव । ब्रह्माची राणीव आम्हां घरी ।।२।।
रिकामा बरळू नसे खेळेमेळे । ब्रह्माची कल्लोळे भोगीतुसे ।।३।।
निवृत्ति सरळ निरसले अज्ञान । सर्वत्र संपन्न आत्माराम ।।४।।

******

# ।। श्री निवृत्तिनाथ महाराज नमन ।।

निवृत्तिनाथ माझा महेशु खरोखरु ।
आत्मरुपी सदा स्थिरु शांतिचा दातारु ।।१।।
गहिनीनाथे बोध करिता आत्मरुपी झाला त्वरु ।
जनोद्धारालागी आला हो देव हा भूवरु ।।२।।
सांभाळिले भावंडांते जसे पोटीचे लेकरु ।
कृपाछत्र त्याचे केवळ सर्वांसी आधारु ।।३।।

मायबाप त्यागी शरीर परि नेणीव नेदी उरु ।
भावंडांसी झाला मायबाप, आणी तोचि गुरु ।।४।।
ज्ञाना सोपाना मुक्ताईसी झालासे सद्गुरु ।
कृपे निज पावविले अवघ्यांसी पैलपारु ।।५।।
‘ज्ञानेश्वरी वदतो मी जो बोलविता श्रीगुरु ।
अनुभवामृत त्यांचे कृपे’, वदले ज्ञानेश्वरु ।।६।।
ज्ञान शांति वैराग्याचा नाथ महामेरु ।
संप्रदाय महाराष्ट्री तोचि त्यासी आधारु ।।७।।
योगी वरिष्ठ परि गाईला नामाचा बडिवारु ।
वैष्णवांची मांदियाळी नेली गुढी पंढरपुरु ।।८।।
कनिष्ठ आधी समाधिस्थ पहा कैसा धैर्य मेरु ।
आठवण ती येता नयनी भरुनि येते नीरु ।।९।।
मन किती प्रेमळ कोमल परि सहनशक्ति अपारु ।
आघात सारे सोसुनिया वाचे ना उच्चारु ।।१०।।
अंतरीची वेदना त्यांची कल्पना मज नये करु ।
भावविगलित ह्रदयस्थिति लेखनी हस्त थरथरु ।।११।।
तिन्ही लोकी पहा पहा नाही होणे ऐसा नरु ।
स्मरणेचि येते ह्रदय भरुनि अनिवारु ।।१२।।
करुनि सर्व अलिप्त कैसा, वाटे अतिशय नवलाकारु ।
देखिले ना ऐशा संता, विराला अहंकारु ।।१३।।
मज मना हाचि गमे संतवरु ।
मन इच्छी प्रवेशाया दर्शना समाधी विवरु ।।१४।।
ज्येष्ठ म्हणुनि कायी ज्येष्ठ मासी त्यागियेले शरीरु ।
ब्रह्मगिरी गुरु सानिध्दी राहिला हा अवतारु ।।१५।।

नाही नाही नाही गेला, प्राण सहस्त्रारु ।
विश्वकल्याणासी झटतसे निरंतरु ।।१६।।
योगिनी एकादशीसी यात्रा चाले त्र्यंबकेश्वरु ।
राम कृष्ण हरि नाम सर्वांमुखी गजरु ।।१७।।
दर्शना जाता तेथ प्रवेशिता गाभारु ।
शांत स्थिर निवृत्तिचा अनुभव येई अंतरु ।।१८।।
गाऊनिया गुण कथा हर्षे येतो उर माझा भरु ।
सुखसागर कल्लोळी मी, मनी हासे श्रीगुरु ।।१९।।
मन धावे लेखणीही, कैसे त्यासी आवरु? ।
शब्दफुलांची ही माला, माये करि गे स्वीकारु ।।२०।।
पुण्यतिथि आज चला भावे स्मरण करु ।
त्र्यंबकेश्वरी जाऊनिया मनेचि नमन करु ।।२१।।
आशीर्वाद घेण्या मन माझे अधीरु ।
ज्ञानदान देऊनिया आत्मरुपी करा हो स्थिरु ।।२२।।
कृष्णदास प्रार्थितसे माथा ठेवा पद्मकरु ।
निवृत्तिराया घेई कुशीत तुझे मी लेकरु! ।।२३।।

पौष वद्य एकादशी शके १९३५ (२७ जानेवारी २०१४)